Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

# आदिवासी समाजातील अध्यययनकर्त्याच्या शैक्षणिक निष्पत्तीवर सामाजिक आर्थिक स्तरांचा होणारा प्रभाव – एक अध्ययन

प्रा. प्रिती त्र्यंबकराव तोटावार,
सहाय्यक प्राध्यापक,
शिवरामजी मोघे महाविद्यालय,
पांढरकवडा, जि. यवतमाळ,
(महाराष्ट्र) – 445 302.

**प्रास्ताविक :**

एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज'म्हणतात आदिवासी समाज' हा भारतीय जनजीवनापासून प्रादेशिक आणि सांस्कृतिकदृष्टया अलिप्त आहे. राज्यातले आदिवासी हे महाराष्ट्राच्या जनतेचा अविभाज्य भाग आहेत. महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या राज्याच्या एकूण लोकसंखेच्या 8.87% एवढी आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता, दारिद्रय, बेकारी, अस्वच्छता, रोगराई, कर्जबाजारीपणा आणि शोषणाच्या चक्रात हा समाज भरडून निघाला आहे. दारिद्रयामुळे शिक्षण नाही आणि शिक्षणाअभावी विकास नाही अशी परिस्थीती हया समाजात आढळते.

आदिवासी समाजातील अध्ययनकर्त्याच्या अध्ययनावर सामाजिक, सांस्कृतिक ,रुढी परंपरा, भाषा यांचा मोठा प्रभाव पडतो. मुलांमध्ये विशिष्ट सवयी, अभिवृती मुल्ये या सामाजिक सांस्कृतिक घटकांनीच निर्माण होतात. अशाप्रकारे हे विविध घटक अध्ययनार्थ्याच्या शैक्षणिक निष्पत्तीवर परिणामकारक ठरत असल्यामुळे याविषयी अध्ययन करण्याकरीता प्रस्तुत संशोधन समस्या निश्चित करण्यात आली.

**संशोधनाची गरज :**

आदिवासी समाजातील व्यक्तींमध्ये अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रता, रोगराई तसेच कर्जबाजारीपणा हयासारख्या विविध समस्या आहेत व याचा परिणाम अध्यनकर्त्याच्या शैक्षणिक निष्पत्तीवर कशा प्रकारे होतो याचे अध्ययन करण्याकरीता या संशोधनाची गरज आहे म्हणून सदर विषयाची निवड करण्यात आली.

**संशोधनाचे महत्व :**

या संशोधनामुळे आदिवासी समाजातील व्यक्तींना अध्ययनार्थीच्या अध्ययनाचे जीवनात असणारे महत्व लक्षात येईल.

**संशोधन शीर्षक :**

आदिवासी समाजातील अध्ययनकर्त्याच्या शैक्षणिक निष्पत्तीवर सामाजिक आर्थिक स्तरांचा होणारा प्रभाव – एक अध्ययन

कार्यात्मक व्याख्या :

१ **आदिवासी समाज**

कातकरी, कोलाम, कोरकु, गोंड, ताडवी, परधान, भिल्ल, कोळी, माडिया, वारली, गोवारी अशा ४७ जाती उपजातींमध्ये विभागला गेलेला समान बोली बोलणारा आणि भूप्रदेशावर राहणारा समूह म्हणजेच समाज होय.

२ **अध्ययनकर्ता**

जो अध्ययन करतो तो अध्ययनकर्ता

३ **शैक्षणिक निष्पत्ती**

शिक्षणविषयक कौशल्य किंवा सिध्दता म्हणजेच शैक्षणिक निष्पत्ती होय.

४ **सामाजिक – आर्थिक स्तर**

कौटुंबिक पार्श्वभूमी, शैक्षणिक पातळी, व्यवसाय, उत्पन्न, वंश, सामाजिक प्रश्नांबाबतचा दृष्टीकोण यावर आधारीत लोकांच्या समान असलेल्या पातळीचा दर्जा म्हणजेच सामाजिक – आर्थिक स्तर होय.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१ आदिवासी समाजातील अध्ययनार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेवर परिणाम करणा-या विविध घटकांचे अध्ययन करणे.

२ आदिवासी समाजातील अध्ययनार्थ्यांच्या सामाजिक–आर्थिक स्तराचा शैक्षणिक निष्पत्तीवर होणारा प्रभाव अभ्यासणे.

**गृहितके**

1. आदिवासी समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव अध्ययनकर्त्यावर पडतो.
2. आदिवासी समाजातील अध्ययनकर्त्यांमध्ये शैक्षणिकदृष्टया मागासलेपण आढळून येते.

**संशोधनासाठी नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी यवतमाळ जिल्हयाअंतर्गत येणा-या केळापूर तालुक्यातील पांढरकवडा येथील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी च्या १०० अध्ययनार्थ्यांची यादृश्चिक तंत्राने (लॉटरी पध्दत ) निवड करण्यात आली.

**व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत संशोधन यवतमाळ जिल्हयाअंतर्गत येणा-या केळापूर तालुक्यातील पांढरकवडा येथील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी च्या अध्ययनार्थीपुरतेच मर्यादीत होते. त्याचप्रमाणे या संशोधनात आदिवासी समाजातील अध्ययनार्थ्यांच्या शैक्षणिक निष्पत्तीवर प्रभाव पडणा-या घटकांचा अभ्यास करण्यात आला.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

**संशोधन साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वनिर्मीत प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला. या प्रश्नावलीमधून संशोधनास आवश्यक ती माहिती मिळाली आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्रे**

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करण्याकरीता शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाची निवड करण्यात आली.

**विश्लेषण पध्दती**

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये प्राप्त माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करुन टक्केवारीत रुपांतर करण्यात आले व वारंवारीता काढण्यात आली. सारणी करणाच्या आधारे निरीक्षण काढून त्याचे अन्वयार्थ लावण्यात आले व त्यावरुन निष्कर्ष काढण्यात आले.

**सर्वेक्षण माहिती सारणी**

आदिवासी समाजातील सामाजिक आर्थिक, सांस्कृतीक परिस्थितीचा अध्ययनार्थ्यांवर होणारा प्रभाव.

| कारणे | वारंवारिता (Frequency ) | टक्केवारी ( percent ) | गणना (Rank ) |
|---|---|---|---|
| अध्ययनार्थीची अभ्यासात असलेली नावड | ६० | १००.० | १ |
| आर्थिक समस्या | ५५ | ९१.७ | २ |
| आरोग्यविषयक समस्या | ४० | ६६.७ | ५ |
| शाळेचे घरापासून अंतर | ४८ | ८०.० | ४ |
| वाढत्या कौटूंबिक जबाबदा-या | ५१ | ८५.० | ३ |
| पालकांची पाल्यांच्या शिक्षणाबाबत असलेली उदासिनता. | ३२ | ५३.३ | ७ |
| शाळेतील गैरकृत्ये (बालगुन्हेगारी) | ५ | ८.३ | ११ |
| भाषा समस्या | २४ | ४०.० | ८ |
| शिघ्र विवाह | १९ | ३१.७ | ९ |
| पोषक अन्नाचा अभाव | ५ | ८.३ | १० |
| मार्गदर्शनाचा अभाव | ३४ | ५६.७ | ६ |

**निष्कर्ष :**

अ) **कौटूंबिक व सामाजिक कारणे.**

१) सामाजिक आर्थिक स्तरांचा पाल्याच्या शिक्षणावर प्रभाव पडतो.

२) 91.7% कुटूंबाची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे पालकांचे पाल्याच्या शिक्षणाकडे लक्ष नाही व ते पाल्याच्या शिक्षणाचा आर्थिक भार उचलू शकत नाही.

३) घरच्या परिस्थितीमुळे ८५.०% बालकांना अर्थार्जन करावे लागते त्यामुळे असे विद्यार्थी नियमित शाळेत येऊ शकत नाही.

४) १००.०% विद्यार्थ्यांना अभ्यासात रुची नाही.

५) ९१.७ % पालक एका ठिकाणी स्थिर राहून अर्थार्जन करु शकत नाहीत. पोटापाण्यासाठी त्यांना सतत हिंडत राहावे लागते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

६) ५३.३ % कुटुंबात पालकांवर शिक्षणाचे संस्कार झालेले नाहीत ते स्वतः निरक्षर आहेत. त्यामुळे अशा पालकांना शिक्षणाचे महत्व न कळल्यामुळे ते आपल्या पाल्याला अध्ययनाकरीता प्रोत्साहीत करीत नाही.

७) ८५.० % मुलींना घर सांभाळावे लागते, प्रसंगी लहान भावडांना सांभाळण्याची जबाबदारी पण त्यांना उचलावी लागते. मुलींना शिक्षणाची गरज नसून त्यांना फक्त घर सांभाळता आले की झाले मुली जास्त शिकल्या तर लग्नाच्या वेळी अडचण निर्माण होईल असा स्त्री-शिक्षणाकडे पाहण्याचा परंपराग्रस्त दृष्टीकोन समाजात दिसून येतो.

८) ८०.० % विद्यार्थ्यांचे खेडयांमध्ये वास्तव्य असल्यामुळे आणि शाळा दुस-या गावी असल्यामुळे पाल्य नियीमत शाळेत येत नाही.

९) ३१.७ % मुलींचे विवाह लवकर झालेले दिसून येतात.

१०) ८.३ % कुटुंबात पाल्यांना पोषक अन्न मिळू शकत नाही.

ब ) **शैक्षणिक कारणे**

१) ४०.०% विद्यार्थ्यांना भाषाविषयक समस्या आहे. अशा विद्यार्थ्यांना फक्त त्यांची बोलीभाषा येत असल्यामुळे प्रमाण भाषेतील अध्यापन त्यांना समजत नाही.

२) शिक्षकांच्या नीरस अध्यापनामुळे व मार्गदर्शनाअभावी ५६.७% विद्यार्थ्यांना शाळेत रस वाटत नाही.

३) ८.३% विद्यार्थ्यांना अयोग्य संगत असल्यामुळे बालगुन्हेगारीकडे वळतात

**शिफारशी :**

१) आदिवासी समाजातील मुलांच्या पालकांना मुले शाळेत पाठविण्यासाठी प्रोत्साहन दयावे.

२) वसतिगृहाच्या सोयी उपलब्ध करुन द्याव्यात

३) पाठयपुस्तके, वहया इत्यादी आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवावे.

४) मधल्या वेळच्या आहाराची शाळेत सोय करावी.

५) राज्य परिवहन गाडयांतून मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करुन द्यावी

६) तज्ञ शिक्षक नेमून विद्यार्थ्यांवर खास लक्ष ठेवावे.

७) शिष्यवृत्या इत्यादी प्रोत्साहनपर योजना आखाव्यात.

८) आदिवासी बोलीतून अभ्यासक्रम आखावेत अध्यापनाच्या साहित्याची निर्मीती करावी.

९) आदिवासी संस्कृती व प्रतिभा यांची जाणीव लक्षात घेऊन अभ्यासक्रम आखावेत.

१०) शिक्षक व ग्रामशिक्षण समितीच्या सदस्यांनी घरोघरी जाऊन पाल्याला शाळैत पाठविण्यासाठी पालकांचे मन वळवावे.

११) सुट्टया शेतीचा हंगाम पाहून ठरवाव्यात.

१२) मुलींसाठी औपचारीक शिक्षणाच्या ठिकाणी कौशल्ये, ग्रमीण परिस्थीती व रोजगार परिस्थिती यांच्याशी निगडीत व्यावसायीक शिक्षण देण्याचे पर्याय शोधावेत.

संदर्भ :

१) दुनाखे, अरविंद, देशपांडे, लीना (२००८) , प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र पुणे, नित्य नूतन प्रकाशन

२) क-हाडे, बी,एम, (२००७) शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर , पिंपळापूरे ॲण्ड कं, पाब्लिशर्स.

३) साठे विजय, तुळपुळे इंदवी (२०१२), आपले हक्क आणि त्यांची परिपूर्ती, नाशिक, ओरिएंट प्रेस लि